# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०–२५६२१०४५
०२०–२५६२१०४८
०२०–२५६२१०४९

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
naac@unipune.ac.in
iqac@unipune.ac.in

संदर्भ क्र.:– अंगुसिक/३८१ दिनांक – २०/०३/२०२३

**महत्वाचे व अत्यंत तातडीचे**

प्रति,
मा. प्राचार्य,
संबंधित सर्व संलग्न महाविद्यालये,
आणि स्वायत्त महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय – **माहिती व्यवस्थापन प्रणाली (DHEMIS)** वेबपोर्टलवर सन २०२२–२३ या वर्षाची **माहिती नोंदविणेबाबत.**

संदर्भ – मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे–१ यांचे पत्र क्र. उशिसं/सांख्यिकी/**एमआयएस**/२०२२–२३/३५२७, दि. १७ मार्च, २०२३.

महोदय/महोदया,

प्रतिवर्षाप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षणाबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सन २०२२–२३ या शैक्षणिक वर्षाची सांख्यीकी माहितीची अत्यंत आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या पुणे,अहमदनगर, नाशिक जिल्हयामधील व दादरा नगर हवेली या केंद्र शासित प्रदेशातील अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयांस **DHEMIS वेबपोर्टलव्दारे माहिती १६/०३/२०२३ पासून उपलब्ध करून देण्यात आली आहे. (सोबत प्रत)**

सन २०२२–२३ मध्ये /पूर्वी ज्या महाविद्यालयांना राज्य सरकारकडून मान्यता व प्रस्तुत विद्यापीठातील शैक्षणिक विभागाकडून संलग्नीकरण मिळालेले आहे, अशा सर्व महाविद्यालयांनी **माहिती व्यवस्थापन प्रणाली** कार्यक्रम **M.I.S.** वर नोंदणी करून माहिती भरणे बंधनकारक आहे. जर संबधित महाविद्यालयांनी सदर वेबपोर्टलवर नोंदणी केली नाही तर भविष्यात होणाऱ्या नुकसानीस संबधीत महाविद्यालयांचे मा. प्राचार्य/मा. नोडल अधिकारी जबाबदार असतील याची कृपया गांभिर्यपूर्वक नोंद घ्यावी.

तसेच सन २०२२–२३ हया वर्षात विद्यापीठाशी नव्याने संलग्नित असलेल्या महाविद्यालयांना नव्याने मान्यता मिळालेली आहे, अशा महाविद्यालयांनी **माहिती व्यवस्थापन प्रणाली** कार्यक्रम **M.I.S.**

कार्यक्रमाअंतर्गत संबधीत वेबपोर्टलवर अदयाप नोंदणी झाली नसलेल्या महाविद्यालयांची माहिती (Excel Sheet) मध्ये मा. संचालनालयास त्वरीत उपलब्ध करून दयावी, सोबत नमुना देण्यात येत आहे. सदर नवीन महाविद्यालयांची माहिती दि. २५/०३/२०२३ पर्यंत मा. संचालनालयास दिलेल्या नमुन्यात पाठवावी. तसेच दि. २५/०३/२०२३ नंतर कोणत्याही महाविद्यालयाचे नाव सदरच्या प्रणाली मध्ये समाविष्ट करण्यात येणार नाही व याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाच्या मा.प्राचार्य/मा.नोडल अधिकाऱ्यांची राहील.

तसेच मा. उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त ज्या महाविद्यालयांना २०२१—२२ पुर्वीची/मध्ये मान्यता मिळालेली आहे, परंतु अद्यापही त्यांनी आपल्या महाविद्यालयांची नोंद (रजिस्ट्रेशन), मा. उच्च शिक्षण संचालनालयाच्या वेबपोर्टलवर केलेली नाही अशा सर्व महाविद्यालयांनी, तसेच **अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE)** च्या वेबपोर्टलवर/नोंदणी केलेली आहे, परंतु उच्च शिक्षण संचालनालयाच्या वेबपोर्टलवर/नोंदणी केलेली नाही अशा प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिनस्त महाविद्यालयांनी मा. उच्च शिक्षण संचालनालयाच्या www.dhemis.maharashtra.gov.in या वेबपोर्टल नोंदणी/रजिस्ट्रेशन करून, दि. ३० सप्टेंबर, २०२२ या संदर्भ दिवसाची प्रशासकीय, शैक्षणिक व शिक्षकेतर बाबींची माहिती वेबपोर्टलवर नोंदविणे अनिवार्य आहे.

संबधीत महाविद्यालयांनी **माहिती व्यवस्थापन प्रणाली** कार्यक्रम **M.I.S.** मध्ये शैक्षणिक वर्ष सन २०२२—२३ ची माहिती पुर्णपणे भरल्यानंतर सदर महाविद्यालयांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करून विहीत मुदतीत **"ना—हरकत प्रमाणपत्र"** प्राप्त करून घेणे बंधणकारक आहे याची महाविद्यालयांच्या मा. प्राचार्य/मा. नोडल अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.

सदरील माहिती शासनास अत्यावश्यक असून महाविद्यालयांनी **दि. १० एप्रिल, २०२३** पर्यंत पूर्ण माहिती भरणे बंधनकारक असून लवकरात लवकर पूर्ण करून सहकार्य करावे. या संदर्भात काही अडचणी आल्यास महाविद्यालयांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष, ०२०—२५६२१०४८/४९ यांच्याशी संपर्क साधावा.

आपला,

(श्री. श्रीकांत गायकवाड)
सहायक कुलसचिव,

प्रत माहितीसाठी —

१. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ
२. कार्यकारी सहायक, मा. प्र—कुलगुरू कार्यालय,
३. स्वीय सहाय्यक, मा. कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण),
मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१
कार्यालयाचे संकेतस्थळ :- www.dhepune.gov.in कार्यालयीन ई-मेल:-stat.dhepune@nic.in
फोन क्र:- ०२०/२९७०७०९३

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
विद्यापीठ
आवक
टिपणी
जावक दिनांक 20/03/2023
17 MAR 2023

क्र.उशिसं/सांख्यिकी/एमआयएस/२०२२-२३/ ३५२६ दिनांक - १५.०३.२०२३

प्रति,

१.सहसंचालक (उच्च शिक्षण),
पुणे/मुंबई/नागपूर/अमरावती/औरंगाबाद/कोल्हापूर/सोलापूर/नांदेड/जळगांव/पनवेल.

२.कुलसचिव,
सर्व अकृषी/अभिमत/ स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे,

विषय - माहिती व्यवस्थापन प्रणाली (DHEMIS) वेबपोर्टलवर सन २०२२-२३ या वर्षाची माहिती नोंदविणेबाबत.

उच्च शिक्षण संचालनालयाने www.dhemis.maharashtra.gov.in हे एमआयएस माहिती नोंदणीचे वेबपोर्टल विकसित केले आहे. संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व सहसंचालक कार्यालये, विदयापीठे आणि संलग्नित महाविदयालये सन २०१३-१४ पासून हया वेबपोर्टलवर ऑनलाईन पध्दतीनुसार प्रत्येक वर्षाकरीता प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची माहिती नोंदवित आहेत हे आपणांस विदित आहेच.

संचालनालयाकडून सन २०२२-२३ हया वर्षाच्या माहिती नोंदणीची वेबलिंक वरील वेबपोर्टलवर दि.१६.०३.२०२३ पासुन उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सन २०२२-२३ करीता सहसंचालक कार्यालये व उच्च शिक्षण संचालनालयाचे अधिनस्त सर्व अकृषी/अभिमत/खाजगी विदयापीठे आणि संलग्नित सर्व महाविदयालयांनी दिनांक ३० सप्टेंबर २०२२ या संदर्भ दिवसाची प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची माहिती वेबपोर्टलवर नोंदविणे अनिवार्य आहे. माहिती नोंदणीचे काम व त्यानंतर नोंदविलेल्या माहितीची वैधता पडताळणी करुन व आवश्यक तेथे दुरुस्त्या करण्याचे काम सर्व सहसंचालक कार्यालये, विदयापीठे आणि संलग्नित महाविदयालयांनी दिनांक २०.०४.२०२३ अखेर निश्चितपणे पूर्ण करावयाचे आहे तसेच कोणत्याही प्रकारची मुदतवाढ देण्यात येणार नाही. सन २०२२-२३ च्या माहिती नोंदणीच्या कामाचा अहवाल संचालनालयाकडुन तातडीने शासनाला सादर करावयाचा असल्याने वरील माहिती नोंदणीचे व वैधता पडताळणी करण्याचे काम तातडीने पुर्ण होईल यादृष्टीने सर्व सहसंचालक कार्यालये व विदयापीठांनी कामाचे संनियंत्रण करावे.

सहसंचालक कार्यालयांचे, विभागातील अनुदानित महाविदयालयांवर थेट नियंत्रण असल्यामुळे त्यांनी आपल्या विभागातील अनुदानित महाविदयालयांच्या आणि आपल्या सहसंचालक कार्यालयाच्या एमआयएस माहिती नोंदणीचे काम विहित मुदतीत पूर्ण करुन घ्यावे. विदयापीठांनी आपल्या विदयापीठातील नियुक्त करण्यात आलेल्या एमआयएस नोडल अधिका-यांकडुन आपल्या विदयापीठाचे माहिती नोंदणीचे काम विहित मुदतीत पूर्ण करुन घ्यावे. विदयापीठांशी संलग्नित असलेल्या महाविदयालयातील माहिती नोंदणीबाबत विदयापीठस्तरावरुन स्वतंत्र पत्र, ई-मेल, दूरध्वनीव्दारे संबंधित महाविदयालयाच्या प्राचार्यांना कळविण्यात यावे आणि काम पूर्ण करुन घेण्यात यावे.

Dir, IQAC

(कृमाप)

**वेबपोर्टलवर अदयाप नोंदणी झाली नसलेल्या महाविदयालयांकरीता -**

सन २०२२-२३ हया वर्षात विदयापीठाशी नव्याने संलग्नित असलेल्या तथापि एमआयएस वेबपोर्टलवर अदयाप नोंदणी झाली नसलेल्या महाविदयालयांची माहिती Excel Sheet मध्ये संचालनालयास त्वरीत उपलब्ध करुन दयावी, सोबत नमुना देण्यात येत आहे. सदर नवीन महाविदयालयांची माहिती दि.२५.०३.२०२३ पर्यंत संचालनालयास दिलेल्या नमुन्यात पाठवावी. तसेच दि.२५.०३.२०२३ नंतर कोणत्याही महाविदयालयाचे नाव प्रणालीमध्ये समाविष्ट करण्यात येणार नाही व याची सर्वस्वी जबाबदारी विदयापीठ नोडल अधिकाऱ्यांची राहील. या अनुषंगाने संबंधित महाविदयालयांशी पत्र व दूरध्वनीव्दारे संपर्क साधून वेबपोर्टलवर नोंदणी करुन घेण्यात यावी. तसेच सन २०२२-२३ यावर्षात बंद असलेली अथवा असंलग्नित असलेली (De-affiliate) महाविदयालयांची यादी संचालनालयास सादर करण्यात यावी. सदरील महाविदयालये सिस्टिममधून डिॲफिलेट करण्यात येतील ज्यामुळे संबंधित महाविदयालयांकडे माहिती भरण्याबाबत पाठपुरावा करण्याची आवश्यकता राहणार नाही.

तसेच उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त ज्या महाविदयालयांना २०२१-२२ पुर्वीची/मध्ये मान्यता मिळालेली आहे, परंतु अद्यापही त्यांनी आपल्या महाविदयालयाची नोंद (रजिस्ट्रेशन),उच्च शिक्षण संचालनालयाच्या वेबपोर्टलवर केलेली नाही अशा सर्व महाविद्यालयांनी तसेच अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) च्या वेबपोर्टलवर रजिस्ट्रेशन/नोंदणी केलेली आहे, परंतु उच्च शिक्षण संचालनालयाच्या वेबपोर्टलवर नोंदणी केलेली नाही अशा उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त विद्यापीठांनी/महाविदयालयांनी, उच्च शिक्षण संचालनालयाच्या www.dhemis.maharashtra.gov.in या वेबपोर्टल नोंदणी/रजिसट्रेशन करुन, दिनांक ३० सप्टेंबर २०२२ या संदर्भ दिवसाची प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची माहिती वेबपोर्टलवर नोंदविणे अनिवार्य आहे.

**महाविदयालयांची माहिती प्राप्त झालेबाबतचे प्रमाणपत्र देणेबाबत -**

सर्व महाविदयालयांकडुन वेबपोर्टलवर अचूक व वैध माहिती विहित मुदतीत नोंदवून घेण्याकरीता विदयापीठामार्फत संनियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. या अनुषंगाने एमआयएस वेबपोर्टलवर माहिती भरलेल्या महाविदयालयांचीच कामे (उदा. संलग्नीकरण, परीक्षानिकाल व अनुषंगिक कामे) विदयापीठातील इतर शाखा/विभागामार्फत पुढील कार्यवाहीकरीता स्विकारली जावीत. याबाबत संबधित शाखेच्या प्रमुखांना कळविण्यात यावे. याकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

महाविदयालयांनी सन २०२२-२३ ची माहिती व्यवस्थितरित्या नोंदल्याचे तसेच ती पडताळून बरोबर असल्याचे प्रमाणपत्र संबंधित महाविदयालयाच्या प्राचार्यांकडुन घेण्यात यावे. सदरील प्रमाणपत्राची एक प्रत संचालनालयास वरील ई-मेलव्दारे सादर करण्यात यावी. महाविदयालयांकडुन प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर विदयापीठाच्या एमआयएस नोडल अधिका-यांनी सदरील माहितीची पडताळणी करुन संबंधित महाविदयालयास सन २०२२-२३ च्या माहिती नोंदणीचे काम पूर्ण केल्याबाबतचे आणि महाविदयालयाची विदयापीठातील इतर शाखा/विभागांशी संबंधित असलेली अथवा वर नमूद केलेली कामे स्विकारण्यास हरकत नसल्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र दयावे. पडताळणी केलेल्या माहितीमध्ये विसंगती आढळल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत नोडल अधिकाऱ्याची/विदयापीठ नोडल अधिकाऱ्याची राहील याची कृपया नोंद घ्यावी.

विदयापीठाच्या एमआयएस नोडल अधिका-यांचे माहिती नोंदणीचे प्रमाणपत्र संबंधित महाविदयालयाने सादर केल्यानंतर विदयापीठातील इतर शाखा/विभाग यांचेकडुन संबंधित महाविदयालयाची वर नमूद केलेली कामे पुढील कार्यवाहीसाठी स्विकारण्यात यावीत. ज्यामुळे महाविदयालयांकडुन केल्या जाणा-या माहिती नोंदणीच्या कामावर योग्य सनियंत्रण राखणे शक्य होईल. वरील दोन्ही प्रमाणपत्राचा नमुना सोबत जोडला आहे.

डॉ.शैलेंद्र देवळाणकर
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे.

(क्रमाप)

(महाविदयालयांकडुन माहिती भरल्याबाबत प्राप्त करावयाचे)

**-: प्रमाणपत्र :-**

प्रमाणित करण्यात येते की, माहिती व्यवस्थापन प्रणाली (एम.आय.एस) सन २०२२-२३ या वेबपोर्टलवर ---------------------------------------------------------------- हया महाविदयालयाची शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची सर्व माहिती नोंदविली आहे. सदरील माहितीची पडताळणी करण्यात आली असून ती बरोबर व वैध असल्याचे आढळून आले आहे. त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी आहे.

(स्वाक्षरी)
प्राचार्य
महाविदयालयाचे नांव व सील

दिनांक

ठिकाण -

---

(महाविदयालयांना विदयापीठाकडुन दयावयाचे ना- हरकत प्रमाणपत्र )

**-: प्रमाणपत्र :-**

प्रमाणित करण्यात येते की, माहिती व्यवस्थापन प्रणाली (एम.आय.एस) सन २०२२-२३ या वेबपोर्टलवर ---------------------------------------------------------------- हया महाविदयालयाची शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची सर्व माहिती नोंदविली आहे. महाविदयालयाकडे कोणतीही माहिती प्रलंबित नाही. सबब सदरील महाविदयालयाची कामे विदयापीठाच्या संबंधित शाखेकडुन पुढील कार्यवाहीकरीता स्विकारण्यास हरकत नाही.

दिनांक -

ठिकाण

विदयापीठ नोडल अधिकारी
माहिती व्यवस्थापन प्रणालीकरीता
(विदयापीठाचे नांव)

# New College Addition in MIS for year 2022-23

| Sr. No. | College Type | AISHE Code | College Name | Address | District | Taluka | Affiliating University Name | Year from Which Admission Started | Year Establishment | Head of the Institute | Contact No. | email ID |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | | | | | |